स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखेतील लोकप्रशासन विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

मराठवाड्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासन व त्यांच्या समस्या : एक प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

संशोधक

सिताफुले मोहन हुल्लाजी

मार्गदर्शक

डॉ. गित्ते आशा नरसिंगराव

महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, मुखेड जि.नांदेड.

संशोधन केंद्र

लोकप्रशासन विभाग

नेताजी सुभाषचंद्र बोस, महाविद्यालय, नांदेड.

मराठवाड्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासन व त्यांच्या समस्या : एक प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

❖ **प्रस्तावना (Introduction) :**

प्राचीन काळापासून शिक्षणाला सुरुवात जरी झाली असली तरी हजारो वर्षाचा काळ लोटला तरी शिक्षणाची शिदोरी म्हणावी तशी अजून तळागाळातील विद्यार्थ्यापर्यंत पोहोचलीच नाही. किंबहुना म्हणावे तशी गुणवत्तापूर्ण व कौशल्याधिष्ठीत शिक्षण अदयापपर्यंत आपण मुलांना देऊ शकलो नाही. याची अनेक कारणे आहेत. प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन विविध स्तरावर चालते. शासनाच्या प्रशासकीय धोरणानुसार शिक्षण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणारी प्रशासकीय फौज जरी असली तरी शिक्षण प्रक्रियेवर म्हणावी तशी पकड निर्माण करता आले नाही.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या स्तरावर विविध प्रशासक कार्य करीत असतात . त्यांनाही विविध समस्या, विविध अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांच्या समस्या व अडचणी समजून घेऊन त्यावर उपाय योजना करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे हे अत्यंत जिकरीचे व महत्वाचे आहे जेणेकरून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षण समाजामधील सर्व घटकापर्यंत पोहचविता येईल .

❖ **प्रशासनाची संकल्पना (Concept of Administration):**

प्रशासन हे खूप पूर्वीपासून चालत आलेले आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्र पुस्तकात प्रशासनाचे म्हणजेच राज्य कसे चालवावे याबाबत नियम व पध्दती याचे वर्णन केलेले आपल्याला पहावयास मिळते. वुड्रो विल्सनने 1887 साली प्रशासनाला राजकारणापासून वेगळे केले आहे. शासन व प्रशासन हे राज्यकारभाराच्या रथाची दोन महत्त्वाची चाके आहेत. राज्यकारभार जर सुरळीत चालवायचा असेल तर शासन व

प्रशासनाची दिशा निश्चित असावी लागते. सरकारने तयार केलेले नियम व कायदे याची अमंलबजावणी करण्याचे कार्य शासन करीत असते. प्रशासन ही शासनाची एक समांतर व्यवस्था आहे. शासनाने तयार केलेल नियम व कायदे हे जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य प्रशासन करीत असते. प्रशासन ही कार्य करून घेण्याची प्रक्रिया आहे. एखादे कार्य पूर्णत्वास नेणे व ते कार्य संपादन करणे म्हणजेच प्रशासन होय. निश्चित ध्येय साध्य करण्याची भावना एखाद्‌या समूहामध्ये निर्माण होते तेथेच प्रशासनाला सुरूवात होते. लोकांच्या गरजा पूर्ण करणे, त्यांची काळजी घेणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे हे प्रशासनाचे कार्य असते. ब-याच विचारवंतांनी प्रशासनाबाबत व्याख्या केलेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे आहेत.

हेनरी फेयॉल यांच्या मते, “ प्रशासन म्हणजे नियोजन करणे, संघटन करणे, आदेश देणे, समन्वय करणे व नियंत्रण करणे होय.”

“एकमेकांना मान्य असलेल्या ध्येयपूर्तीसाठी लोकांनी सहकार्याने केलेली कृती म्हणजे प्रशासन होय.” - हर्बर्ट सायमन

“मानवी आणि भौतिक साधन सामग्रीचे संघटन करून इच्छित ध्येयपूर्तीसाठी त्यांचे निर्देशन करणे म्हणजे प्रशासन होय.” - जॉन पिफनर आणि व्हॅन्स प्रस्थेस.

थोडक्यात एखादे ध्येय साध्य करण्यासाठी नियोजनानुसार सामूहिकरित्या केलेली कृती म्हणजेच प्रशासन होय.

प्रशासन हे नियमित व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. प्रशासनाचा अर्थ उत्तम रीतीने शासन करणे, आदेश किंवा निर्देश देणे आणि नियोजनानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करणे म्हणजे प्रशासन होय. शैक्षणिक प्रशासनात ठरवून दिलेल्या योजनांची कार्यवाही व तयार केलेल्या नियमांची अमंलबजावणी करणे या गोष्टींचा समावेश होतो. प्रशासनात नियोजित कार्याचा आराखडा तयार करणे, त्यानुसार कामाची विभागणी

करणे, साधनसामग्रीचा पुरवठा करणे व कार्यवाही करणे याचा समावेश होतो. तसेच संबंधीत व्यक्तींना कामे ठरवून देणे, नियंत्रण ठेवणे, अहवाल मागविणे, तक्रारीचे सोडवणूक करणे इत्यादी भूमिका पार पाडाव्या लागतात.

शैक्षणिक प्रशासन हे शिक्षणाच्या विविध स्तरावर कार्य करते. त्यामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण इत्यादींचा समावेश होतो. शैक्षणिक विकासासाठी ठरवून दिलेल्या शैक्षणिक धोरणांची आणि विविध उपक्रमांची अंमलबजावणी प्रशासकांना आपापल्या स्तरावर करणे बंधनकारक असते. शिक्षणात अमुलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने लोकशाहीला उपयुक्त नागरिक तयार करण्यासाठी आणि शैक्षणिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शैक्षणिक प्रशासनाची अत्यंत आवश्यकता असते. प्रत्येक जिल्हयात प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन, पर्यवेक्षण व नियंत्रण तसेच शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी करणे या महत्त्वाच्या जबाबदा-या पार पाडाव्या लागतात. त्यासाठी जिल्हा स्तरावर शिक्षणाधिका-यापासून ते मुख्याध्यापकांपर्यंत पदसोपान पध्दतीने प्रशासकांची नियुक्ती केलेली असते. शिक्षणाधिकारी (प्रा.), उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक यांचा समावेश होतो.

प्रशासकाची संकल्पना (The concept of an administrator):

प्रशासन ही एक सामाजिक गरज आहे. समाजामधील विविध सेवा सुरळीत चालण्यासाठी तसेच त्या योग्य प्रमाणात व वेळेत समाजास उपलब्ध होणे गरजेचे असते. त्यासाठी संघटीत प्रयत्नांची आवश्यकता असते. या गरजेमधून प्रशासनाचा

जन्म होतो. निश्चित हेतूच्या पूर्तीसाठी जाणीवपूर्वक व संघटीत प्रयत्नांची गरज निर्माण झाली की त्यामधून प्रशासनाची सुरुवात होते.

शालेय योजना, शासकीय शालेय धोरणाची अंमलबजावणी, देखरेख, नियंत्रण, प्रोत्साहन, माहितीची देवघेव आणि प्रशासनातील पदसोपान क्रमानुसार वरिष्ठ व कनिष्ठ यामधील दुवा साधनारी व्यक्ती म्हणजेच प्रशासक होय. थोडक्यात शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी व नियंत्रण करण्याचे काम करण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते त्यांनाच प्रशासक असे म्हणतात.

- **समस्या सूत्रण (Formulation of problem) :**

समस्या सुत्रण ही संशोधनाची पहिली पायरी आहे. कारण समस्या सुत्रणापासूनच संशोधनाची सुरूवात होते. म्हणून संशोधकाने पुढीलप्रमाणे समस्यासुत्रण मांडलेले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रशासनाची रचना व कार्य कशी आहे ? जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रशासकांची भूमिका कोणती आहे ? जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रशासकांना आपली भूमिका बजावत असतांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते ? जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रशासनाची सद्यस्थिती कशी आहे ? जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विकासात लोकसहभाग आहे का ? जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासक तंत्रस्नेही आहेत का ? जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यी पटसंख्या कमी होण्याची कारणे कोणती ? शासन व स्थानिक प्रशासनाने वेळोवेळी आखलेल्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी व त्यातील अडचणी कोणत्या आहेत ? जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील योजनेची अंमलबजावणी व त्यातील अडचणी ? या व यासारख्या अनेक प्रश्नांच्या तपासणीसाठी, निरिक्षणासाठी व अध्ययनासाठी तसेच त्यावरील उपाययोजनेचा शोध

घेण्यासाठी ‘मराठवाड्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासन व त्यांच्या समस्या : एक प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा’ या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

❖ **संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of the research topic):**

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारात शासनाची व शासनाच्या प्रशासनाची प्रमुख जबाबदारी आहे. इ.स.1947 च्या प्राथमिक शिक्षणाच्या विकासाची महत्त्वाच्या दोन बाबी होत्या. पहिली बाब म्हणजे घटनेच्या 45 व्या कलमान्वये 6 ते 14 वयोगटातील सर्वच मुलांना प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करायचे. दुसरी बाब ही की, शिक्षण पध्दतीचे स्वरूप असे बदलावयाचे की, त्यामुळे उत्पादकतेच्या मूलभूत गरजेला उत्तेजन मिळेल. ह्या बाबी साध्य झाल्या असत्या तर प्राथमिक शिक्षणात अमुलाग्र बदल दिसून आला असता. परंतु प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे आजपर्यंत साध्य होऊ शकले नाही याची कारणे काय ? त्यासाठी प्रशासन कार्यपध्दतीमधील उणिवांचा चिकित्सक विचार करून दोष दूर केला पाहीजे.

संशोधकास असे वाटते की, प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य न होण्यास व गुणवत्तापूर्ण शिक्षण अद्यापपर्यंत न देण्यामागील अनेक कारणे आहेत. त्यात सामाजिक कारणे, आर्थिक कारणे, प्रशासकीय कारणे, सांस्कृतिक कारणे इत्यादींचा समावेश होतो. यापैकीच जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासनही कारणीभूत आहे असे निदर्शनास येते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासन विविध स्तरावर चालते. या विविध स्तरावरील प्रशासकांना येणा-या अनेक अडचणी व समस्या आहेत. त्या अडचणी व समस्या समजून

घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे व त्या कार्यक्षमपणे अंमलात आणणे आजच्या काळाची गरज आहे. तरच जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण समाजातील तळागाळातील समाजापर्यंत पोहोचेल. परिणामी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे अस्तित्व टिकेल. यासाठी 'मराठवाड्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासन व त्यांच्या समस्या : एक प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा' याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

❖ **संशोधन विषयाची उद्दिष्टे (Objectives of the research topic) :**

सदर संशोधन विषयाचे अध्ययन करीत असताना खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात येणार आहेत.

1) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासनाची रचना व स्वरूप याचा अभ्यास करणे.
2) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचे कार्य अभ्यासणे.
3) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासनाची सद्यस्थिती जाणून घेणे.
4) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासकांची भूमिका अभ्यासणे.
5) जिल्हा परिषद प्राथामिक शाळांच्या प्रशासकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
6) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील उपक्रमांची अंमलबजावणी आणि त्यांतील समस्यांचा अभ्यास करणे.
7) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

❖ **संशोधन विषयाची गृहितके (Hypothesis of the research topic) :**

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करीत असताना खालील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

1) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासकांना अनेक समस्या येतात.
2) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची स्थिती बिकट होत आहे.
3) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील प्रशासकांच्या अनुशेषामुळे गुणवतेवर परिणाम होत आहे.
4) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील उपक्रमांची अंमलबजावणी करताना अनेक समस्या दिसून येतात.
5) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येते.
6) प्राथमिक शिक्षणात नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 ची महत्वाची भूमिका आहे.
7) प्राथमिक शिक्षणात पिसा (PISA) या कार्यक्रमाची भूमिका महत्वाची आहे.

❖ **संशोधन पध्दती (Research Method) :**

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये मराठवाडयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रशासन व त्यांच्या समस्येचा अभ्यास करण्यासाठी विशेष संदर्भ म्हणून नांदेड जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. सदरील संशोधन कार्य एका विशिष्ट आराखड्यातून पुर्णत्वास जाण्यासाठी संशोधकाने सामाजिक संशोधन पध्दतीचा आधार घेणार आहे. अचूक निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

❖ तथ्य संकलन (Data Collection) :

कोणत्याही घटनांच्या सत्याचा शोध घेणे हे कल्पनेच्या आधारावर शक्य नसते. त्याकरीता त्या घटनेच्या संबंधीत वास्तविक तथ्यांचे संकलन करणे अतिशय महत्त्वाचे असते. म्हणूनच सदरील संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात येईल.

अ) प्राथमिक साधन सामग्री (Primary Data Collection) :

सदरील संशोधन कार्यासाठी प्राथमिक साधन सामग्री म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रशासकीय अधिकारी व प्रशासक यांची प्रश्नावली व अनुसूचीद्वारे माहिती संकलित करण्यात येणार आहे.

नमुना निवड (Sampling Method) :

सदरील संशोधन कार्यासाठी मराठवाडा या समग्राचा लहानात लहान भाग म्हणून नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रशासनात प्रशासकांची भूमिका महत्वाची असते. म्हणून प्रशासनात महत्वाची भूमिका बजावणारे शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (प्रा.), गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांचा सहेतुक नमुना निवड पध्दतीद्वारे नमुना निवड करण्यात येईल.

ब) दुय्यम साधन सामग्री (Secondary Data Collection) :

सदरील संशोधन कार्यासाठी दुय्यम साधन सामग्री म्हणून संदर्भ ग्रंथ, शोध प्रबंध, शासकीय अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, गॅझेटीअर, वार्षिक अंक, मासिक अंक, शैक्षणिक नियतकालिके, दैनंदिन वर्तमान पत्रे तसेच इंटरनेट, अप्रकाशित साधन इत्यादींचा वापर करण्यात येईल.

❖ **संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र : (Scope and field of research)**

1) प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्हा हे भौगोलिक क्षेत्र निश्चित केले आहे.
2) प्रस्तुत संशोधनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचाच अभ्यास केला आहे.
3) सदरील संशोधन ग्रामीण भागातील इयत्ता १ली ते ४थी, इयत्ता १ली ते ५वी, इयत्ता १ली ते ७वी व इयत्ता १ली ते ८वी चे वर्ग असलेल्या शाळांच्या प्रशासकांपुरतेच मर्यादित आहे.
4) प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक शाळांच्या प्रशासनातील शिक्षणाधिकारी (प्रा.), गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक या प्रशासकांचा अभ्यास करण्यात येईल.
5) सदरील संशोधनासाठी इ.स.2012 ते 2022 असा कालावधी निश्चित करण्यात येईल.

❖ **प्रकरणाची रूपरेषा :**

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना खालील प्रकरण निश्चित करण्यात येणार आहेत.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासन

प्रकरण तिसरे : नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे प्रशासन

एक दृष्टिक्षेप

प्रकरण चौथे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासकांची भूमिका

प्रकरण पाचवे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रशासकांच्या समस्या

प्रकरण सहावे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील उपक्रम आणि योजना

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography) :

1. नरवने मिनल, (1999), 'भारतातील शैक्षणिक आयोग समित्या', नूतन प्रकाशन, पुणे.
2. प्रा. नांदेडकर व्ही.जी. व के'सागर,(1999), 'लोकप्रशासन', अनिरुध्द पब्लिसिंग हाऊस, पुणे.
3. डॉ. आगलावे प्रदीप, (2000), 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर.

4. डॉ. बोधनकर सुधीर, प्रा. अलोणी विवेक, (2003), 'सामाजिक संशोधन पध्दती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

5. ताम्हणकर एस.डी., (1984), 'शैक्षणिक प्रशासन व नियोजन', नूतन प्रकाशन, पुणे.

6. आंबेकर नी.रा. व जोशी स्नेहप्रभा, (1994), 'आधुनिक भारतीय शिक्षण', सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.

7. कामत अ.रा., 'भारतीय शिक्षणाची वाटचाल', लोकवाड़मयगृह प्रा.लि. मुंबई.

8. आकोलकर ग.वि., 'महाराष्ट्रातील शिक्षणाची वाटचाल', श्री. विद्या प्रकाशन, पुणे.

9. डॉ. चौधरी रू.गो. व प्रा. पाटील दि.ह., (1973), 'शैक्षणिक समस्या व महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास', सुविचार प्रकाशन मंडळ, सदाशिव पेठ, पुणे.

10. आकोलकर ग.वि. व पाटनकर ना.वि., (1973), 'शालेय व्यवस्थापन व प्रशासन', निळकंठ प्रकाशन, पुणे.

11. कुकड गुरूप्रसाद व गायकवाड शशी, 'शालेय प्रशासन, प्रबंधन', विद्या प्रकाशन, नागपूर.

12. डॉ. जाधव एम.एल. व डॉ. आर.आर. माने., मार्च (2002) द्वि.आ., 'शालेय व्यवस्थापन', फडके प्रकाशन, कोल्हापूर,.

13. सौ. नामतोडे किरण, (1997), 'शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाह', विद्या प्रकाशन, नागपूर.

14.पाटील लीला व विश्वंभर कुलकर्णी, (1994) द्वि.आ., 'आजचे शिक्षण आजच्या समस्या', श्री विद्या प्रकाशन, पुणे.

15.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, मार्च (2001) प्र.आ., 'शिक्षणाचे आव्हान', जीवन शिक्षण प्रकाशन, पुणे.

16.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2021-2022.

17.पाटील विजय, (1996), 'प्राथमिक शाळांचे उपक्रम', महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

18.प्राचार्य भगत रा.तु., (2001) प्र.आ., 'प्राथमिक शिक्षण', सिध्दराज प्रकाशन, संतोषनगर, कात्रज, पुणे.

19.बापट बा.भो., (1973), 'शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शिक्षण', व्हीनस प्रकाशन, पुणे.

20.Dave P.N., (1997), Primary Education, Fifty Survey of Educational Research 1998-1999, Trend Report, VolI, NCERT, New Delhi.

Websites :

1. www.education.nic.in
2. www.udice.in
3. www.ssa.nic.in
4. www.nanded.nic.in

मासिके :

1.जीवन शिक्षण

2. शिक्षण संक्रमण

संशोधन मार्गदर्शक **संशोधक**

डॉ. गिते आशा नरसिंगराव
महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय,
मुखेड जि.नांदेड.

सिताफुले मोहन हुल्लाजी